**-श्री -**

# अखिल भारतीय मराठी नाटय परिषद, मुंबई
## वार्षिक सर्वसाधारण सभा
## मंगळवार, दिनांक २१ नोव्हेंबर २०२३

अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेची सन २०२२-२०२३ ची वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार, दिनांक २१ नोव्हेंबर २०२३ रोजी दुपारी ३.०० वा. अध्यक्ष श्री. प्रशांत दामले यांच्या अध्यक्षतेखाली यशवंतराव चव्हाण नाटय संकुल, मनमाला टँक रोड, माटुंगा, मुंबई ४०००१६ येथे संपन्न झाली.

या सभेस एकूण ७८ सभासद उपस्थित होते.

उपाध्यक्ष (उपक्रम) श्री. भाऊसाहेब भोईर यांनी उपस्थित सदस्यांचे स्वागत केले.

यानंतर अहवाल वर्षात ज्या रंगकर्मी, सभासद व त्यांचे नातेवाईक, त्याचप्रमाणे ज्या साहित्यिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांचे दुःखद निधन झाले, त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

त्यानंतर अहवाल सालात ज्या रंगकर्मींना पुरस्कार प्राप्त झाले, त्या सर्वांचे सभेने अभिनंदन केले.

**सूचक: श्री. शिवाजी शिंदे**
**अनुमोदक: श्री. कृष्णा जाधव**

**ठराव एकमताने संमत.**

त्यानंतर प्रमुख कार्यवाह श्री. अजित भुरे यांनी सभेची कार्यक्रमपत्रिका सभेस वाचून दाखवली आणि विषयपत्रिकेवरील विषयाप्रमाणे सभेचे कामकाज सुरू झाले.

**- सभेपुढील विषय –**

१. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून सुधारणासह संमत करणे.
२. इतिवृत्तातून निर्माण होणाऱ्या मुद्यांवर विचार करणे.
३. परिषदेचा १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीचा वार्षिक अहवाल सादर करणे व संमत करणे.
४. परिषदेचे १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीचे हिशेब तपासनीसांनी तपासलेले हिशेब सादर करणे व संमत करणे.
५. अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
६. इ.सन २०२३-२०२४ या वर्षाचे अंदाजपत्रक सादर करणे व संमत करणे.
७. इ.सन २०२३-२४ या वर्षाकरिता हिशेब तपासनीसांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
८. नाटय संकुल प्रगतीचा आढावा घेणे व भावी कामकाजाविषयी निर्णय.
९. १०० वे नाटय संमेलनाबाबतची माहिती.
१०. सभासदांकडून रीतसर आलेल्या ठरावांवर व सूचनांवर चर्चा घडवून बहुमताने निर्णय घेणे.
११. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी आलेल्या विषयांची चर्चा करणे व ठराव संमत करून बहुमताने निर्णय घेणे.

**विषय क्र. १: मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून सुधारणासह संमत करणे.**
सदस्य श्री. कृष्णा जाधव यांनी सांगितले की, सभेत इतिवृत्ताचे वाचन होणे गरजेचे आहे. त्याप्रमाणे प्रमुख कार्यवाह श्री. अजित भुरे यांनी दिनांक १० डिसेंबर २०२२ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सभेस वाचून दाखविले व सभेने त्यास एकमताने मंजूरी दिली.

**विषय क्र. २: इतिवृत्तातून निर्माण होणाऱ्या मुद्यांवर विचार करणे.**
सदस्य श्री. गिरीश शिंदे म्हणाले की, मागील सभेच्या इतिवृत्तात मागील हिशेब ना मंजूर करण्यात आलेले आहेत. यासाठी समिती गठीत करावी आणि पुढील सभेत सदर हिशेब सादर करावेत अशी विनंती केली. यावर सभेत साधक-बाधक चर्चा होऊन कार्यकारी समितीने चौकशी समिती नेमावी, याबाबत चौकशी समिती नेमण्यात आली आहे. सभेने याची नोंद घेतली.

सदस्य श्री. कृष्णा जाधव म्हणाले की, पंचवार्षिक निवडणूकीसाठी प्रमुख निवडणूक अधिकारी श्री. गुरुनाथ दळवी यांची नियुक्ती केली होती. परंतु त्यांच्या मानधनाचा विषय मागील सभेत झालेला नाही. तसेच शाखा सक्षमीकरण समिती गठीत करण्यात आलेली आहे, सदर समितीचा अहवाल नाटय परिषदेकडे सादर केला आहे किंवा नाही. तसेच मा.श्री. शरद पवार हे नाटय परिषदेचे विश्वस्त असल्याचे मा. धर्मादाय आयुक्त कार्यालयात नोंद नसल्याचे कोषाध्यक्ष श्री. सतीश लोटके यांचे म्हणणे आहे. परंतु कोषाध्यक्ष श्री. सतीश लोटके हे गेल्या पाच वर्षाच्या कार्यकाळात पदाधिकारी म्हणून कार्यरत असताना त्यांनी याबाबत पाठपूरावा केला आहे का? तसेच आजच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ६० नियामक मंडळ सदस्यांपैकी किती सदस्य उपस्थित आहेत? यासंदर्भात स्पष्टीकरण द्यावे.

यावर प्रमुख कार्यवाह श्री. अजित भुरे म्हणाले की, पंचवार्षिक निवडणूकीसाठी प्रमुख निवडणूक अधिकारी श्री. गुरुनाथ दळवी यांना दिलेल्या मानधनाबाबत आपण आक्षेप नोंदविला आहे, यासंदर्भात आपण, श्री. गुरुनाथ दळवी व अध्यक्ष श्री. प्रशांत दामले यांची बैठक आयोजित केली जाईल. त्यावेळी याचे स्पष्टता दूर होईल. यावर सदस्य श्री. कृष्णा जाधव म्हणाले की, श्री. गुरुनाथ दळवी यांच्यावर मी आक्षेप घेतल्यामुळे त्यांच्यासोबत बैठक घेणे चुकीचे ठरेल. मी आपल्यासोबत चर्चा करण्यासाठी केव्हाही उपस्थित राहीन असे सांगितले. यावर अध्यक्ष श्री. प्रशांत दामले म्हणाले की, आपण, श्री. गुरुनाथ दळवी आणि आम्ही पदाधिकारी यांची संयुक्त बैठक घेतली तर आपला सर्वांचा वेळ वाचेल आणि समोरासमोर सविस्तर चर्चा करण्यात येईल. सभेने याची नोंद घेतली.

चर्चेत सहभागी होत, श्री. दिवाकर दळवी म्हणाले की, दिनांक २२ डिसेंबर २०२२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तात मी मांडलेला मुद्दा आलेला नाही. नाटय परिषदेच्या कोर्ट कचेऱ्या चालू आहेत. तसेच मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त ज्या पद्धतीने तयार केले आहे. त्यावर सविस्तर मुद्दे मांडणार आहे. सदर सभा बेकायदेशीर होती असे सांगितले.

चर्चेत सहभागी होत, प्रमुख कार्यवाह श्री. अजित भुरे म्हणाले की, शाखा सक्षमीकरण समितीचे काम सुरु असून समितीचा अहवाल आल्यानंतर तो सादर केला जाईल. तसेच मा.श्री. शरद पवार हे विश्वस्त असल्याची नोंद मा. धर्मादाय आयुक्त आहे किंवा नाही याचा खुलासा श्री कोषाध्यक्ष श्री. सतीश लोटके करतील. तसेच आजच्या वार्षिक सर्वसाधारण सभेला किती नियामक मंडळ सदस्य उपस्थित आहेत ते, उपस्थित असणाऱ्या सदस्यांच्या स्वाक्षरी घेतल्यानंतर आपल्याला कळविले जाईल. सभेने याची नोंद घेतली.

कोषाध्यक्ष श्री. सतीश लोटके यांनी सांगितले की, मागील पदाधिकाऱ्यांनी मा. धर्मादाय आयुक्त कार्यालयात तहहयात विश्वस्तांची नोंद केलेली नाही, यासंदर्भात मा. धर्मादाय आयुक्त कार्यालयात नोंद नसल्याचे खात्री केली असून सदर नोंद अस्तित्वात असलेली कार्यकारी समिती लवकरच ठराव मांडून तहहयात विश्वस्तांची नोंद करून घेईल. यावर कृष्णा जाधव यांनी विचारणा केली की, नाट्य परिषदेविरुद्ध मा. धर्मादाय आयुक्त कार्यालयात दाखल केलेले दावे मागे घेतले आहेत का? यावर कोषाध्यक्ष श्री सतीश लोटके म्हणाले की, सदर दावे सुरु असून त्याचा लवकरात लवकर अंतिम निकाल लागेल.

प्रमुख कार्यवाह श्री. अजित भुरे म्हणाले की, नाट्य संकुलाची फायर एन.ओ.सी. नव्हती. यासंदर्भात यासंदर्भात सगळ्यांशी सविस्तर चर्चा करून नाट्य संकुल सुरु करण्यापूर्वी फायर एन.ओ.सी. उपलब्ध करून घेतल्याचे सभेत सांगितले. ते पुढे म्हणाले की, घटना दुरुस्तीबाबत मुद्दा मांडण्यात आला आहे. यासाठी वार्षिक सर्वसाधारण सभेची मंजुरी घेऊन घटना दुरुस्ती समिती गठीत करावी असे सांगितले.

सदस्य श्री. प्रदीप कबरे यांनी सांगितले की, वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सभेने वाचण्यापेक्षा ते सर्व शाखांना पाठविण्यात यावे, जेणेकरून शाखेच्या सभासदांना इतिवृत्तातील मुद्दे मांडायचे असतील तर ते ईमेलवर पाठवू शकतील, तसेच मा.श्री. शरद पवार, मा. श्री. शशी प्रभू, मा. डॉ. रवी बापट हे नाट्य परिषदेचे तहहयात विश्वस्त आहेत, त्यानंतर नियुक्त झालेले विश्वस्त हे पाच वर्षाच्या कार्यकाळासाठी विश्वस्त म्हणून असल्याचे सांगितले. सभेने याची नोंद घेतली.

सदस्य श्री. सनित कुलकर्णी म्हणाले की, वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मेलवर पाठवणे गरजेचे आहे. परंतु काही शाखांचे मेल नसल्यामुळे त्यांना इतिवृत्ताची प्रत पोस्टाद्वारे पाठविणे. सभेने याची नोंद घेतली.

सदस्य श्री. सतीश शिंगटे यांनी गेल्या तीन-चार वर्षात बंद असलेले नाट्य संकुल पुन्हा नव्याने सुरु केल्याबद्दल सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. तसेच मागील काळातील पदाधिकाऱ्यांच्या काळात मागील हिशेब ना मंजूर करण्यात आले होते. त्यानंतर कोरोना काळातील आर्थिक बाबींवर मागील नियामक मंडळने आक्षेप नोंदविले होते. याबाबत आपण काय कार्यवाही केलेली आहे? याबाबत खुलासा व्हावा. यावर प्रमुख कार्यवाह श्री. अजित भुरे यांनी सांगितले की, मागील कार्यकारी समितीच्या कार्यकाळात ज्या हिशेबावर आक्षेप घेण्यात आले होते किंवा सदर हिशेब ना मंजुर केले होते, त्यासाठी अस्तित्वात असलेल्या कार्यकारी समितीने चौकशी समिती गठीत केलेली आहे. या चौकशी समितीमध्ये श्री. अभय जोशी, श्री. आशीर्वाद मराठे, श्री. दिलीप दळवी, श्री. दिलीप जाधव यांची निवड करण्यात आली होती. या चौकशी समितीने त्यांचा अहवाल सादर केला आहे. सदर अहवाल मागील कार्यकारी समितीच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांची माहितीकरिता व खुलासा करण्यासाठी पाठविलेला आहे. त्याकरिता त्यांना १५ दिवसाची मुदत देण्यात आलेली आहे. सभेने याची नोंद घेतली.

चर्चेत सहभागी होत सदस्य श्री. सतीश शिंगटे म्हणले की, मागील कार्यकारी समितीच्या सदस्यांचे स्पष्टीकरण आले असतील तर त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

सदस्य श्री. राजन मुठाणे म्हणले की, चौकशी समितीच्या अहवालाप्रमाणे मागील कार्यकारी समितीवर योग्य ती कार्यवाही करण्याचा अधिकार सभेने कार्यकारी समितीला द्यावेत. जेणेकरून घटनेप्रमाणे कार्यवाही करणे उचित ठरले.

सदस्य श्री. कृष्णा जाधव म्हणाले की, वार्षिक सर्वसाधारण सभेतील विषयांबाबत झालेल्या चर्चेचा निर्णय हा कार्यकारी समितीने, नियामक मंडळाच्या सभेत शिफारशीसाठी ठेवावा व त्यानंतर अंतिम निर्णय वार्षिक सर्वसाधारण सभेत घेण्यात यावा. तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त हे सभेमध्ये वाचलेच पाहिजे. सभेने याची नोंद घेतली.

चर्चेअंती इतिवृत्तात उपस्थिती होण्याचा मुद्यामध्ये चौकशी समितीने जो संपूर्ण अहवाल सादर केलेला आहे. त्यावर कार्यकारी समिती योग्य ती कार्यवाही करावी असे ठरले.

सदस्या श्रीमती गीतांजली ठाकरे यांनी जळगाव शाखेसंदर्भातील माहिती सभेस दिली. तसेच जळगाव शाखा पुन्हा कार्यान्वित कशी होईल, याबाबत तातडीने निर्णय द्यावा. यावर प्रमुख कार्यवाह श्री. अजित भुरे म्हणाले की, जळगाव शाखेबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल. जळगाव शाखेच्या सदस्यांनी जळगाव शाखा पुन्हा कार्यान्वीत करण्याबाबत मत मांडले. सभेने याची नोंद घेतली.

सदस्य श्री. रत्नकांत जगताप म्हणाले की, मागील इतिवृतात मा.श्री. शशी प्रभू यांच्या नावाचा उल्लेख करण्यात आलेला आहे. तसेच चौकशी समितीने अहवाल सादर केल्याप्रमाणे तहहयात विश्वस्त मा. श्री. शशी प्रभू यांच्यावर कार्यवाही करणार आहोत का? यावर अध्यक्ष श्री. प्रशांत दामले म्हणाले की, नाट्य संकुलाचे स्ट्रक्चरल ऑडीट केल्यावर नाट्य संकुल दुरुस्ती करून व्यवस्थित सुरु होऊ शकते, हे जेव्हा ऑडीट रिपोर्टमध्ये समजले, तेव्हा मा.श्री. शशी प्रभू यांच्या मार्गदर्शनाखाली नाट्य संकुल दुरुस्तीचे काम सुरु करण्यात आले. नाट्य परिषद ही सेवाभावी संस्था असल्यामुळे मागील कमिटीने काय केले? यापेक्षा आपण काय करू शकतो. याचा जास्त विचार करावा. कारण नाट्यसंकुल सुरु होणे हे आमच्या दृष्टीने प्रथम कार्य होते, ते सुरु करण्यात आलेले आहे. सभेने याची नोंद घेतली.

मागील सभेचे इतिवृत्त बहुमताने संमत करण्यात आले, यासंदर्भात खालील ठराव करण्यात आला.

**ठराव क्र. १**
**दिनांक २२ डिसेंबर २०२२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त दुरुस्तीसह मंजूर करीत आहे.**

**सूचक : श्री. अरविंद देशपांडे**
**अनुमोदक : श्री. अमोल खोले**

**ठराव एकमताने मंजूर.**

**विषय क्र. ३: परिषदेचा १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीचा वार्षिक अहवाल सादर करणे व संमत करणे.**
कोषाध्यक्ष श्री. सतीश लोटके यांनी अहवाल सदर केला. यावर सदस्य श्री. दिवाकर दळवी म्हणले की, अहवालामध्ये उपाध्यक्ष (उपक्रम) श्री. नरेश गडेकर यांचा अध्यक्ष म्हणून नावाचा उल्लेख करण्यात आलेला आहे. यावर कोषाध्यक्ष श्री. सतीश लोटके म्हणाले की, मा.धर्मादाय आयुक्त कार्यालयात श्री. नरेश गडेकर यांच्या अध्यक्ष पदाबाबतच बदल अर्ज दाखल केलेला असून, तो अजून प्रलंबित आहे. यावर सभेत साधक-बाधक चर्चा करण्यात आली. चर्चेअंती प्रमुख कार्यवाह श्री. अजित भुरे यांनी सांगितले की, आपण उपस्थित सर्व सदस्यांचा केलेल्या तांत्रिक मुद्यांचा विचार करून सन २०२२-२३ या कालावधीचा वार्षिक अहवाल बहुमताने मंजूर करण्यात यावा. त्यावर सदस्यांनी सांगितले की, जो पर्यंत मा.धर्मादाय आयुक्त कार्यालयातून अंतिम निर्णय देण्यात येत नाही, तोपर्यंत चेंज रिपोर्ट ग्राह्य धरता येत नाही. यावर प्रमुख कार्यवाह श्री. अजित भुरे म्हणाले की, आपल्या मताचा आदर करून सन २०२२-२३ वार्षिक अहवालातील आपण उपस्थित केलेले मुद्दा वगळून अहवाल मंजूर करावा. विशेष सर्वसाधारण सभेत यावर अंतिम निर्णय घेण्यात येईल. सभेने याची नोंद घेतली व सदरील मुद्दा वगळून इतर अहवाल मंजूर करण्यात आला.

**विषय क्र. ४: परिषदेचे १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीचे हिशेब तपासनीसांनी तपासलेले हिशेब सादर करणे व संमत करणे.**
कोषाध्यक्ष श्री. सतीश लोटके यांनी सन २०२२-२३ या कालावधीचे हिशेब तपासणी यांनी तपासलेले हिशेब सभेस सादर केले. उपस्थित सदस्यांपैकी एका सदस्याने हिशोबाबाबत मुद्दे मांडले. यावर प्रमुख कार्यवाह श्री. अजित भुरे यांनी सांगितले की, सदर हिशेबातील मुद्दे हिशेब तपासणीस मा.श्री. रवी सावंत यांच्यासमोर मांडण्यात येतील. हिशेब तपासणीस मा.श्री. रवी सावंत जी माहिती देतील, सदर योग्यती माहिती आपल्यासमोर मांडण्यात येईल. यावर सभेत साधक-बाधक चर्चा करण्यात आली. कोषाध्यक्ष श्री. सतीश लोटके यांनी सभेस विनंती केली की, सन २०२२-२३ या वर्षाचे हिशेब मंजूर करावेत. चर्चेत सहभागी होत, अध्यक्ष श्री. प्रशांत दामले म्हणाले की, विषय क्रमांक १,३,४ बाबत त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात यावी. या समितीमध्ये अभय जोशी, आशीर्वाद मराठे व दिवाकर दळवी असणार आहेत. यासंदर्भात खालील ठराव करण्यात आला.

**ठराव क्र. २**

**कोषाध्यक्ष श्री. सतीश लोटके यांनी सादर केलेले परिषदेचे १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीचे हिशेब तपासनीसांनी तपासलेले हिशेबबाबत त्रिसदस्य समिती गठीत करण्यासाठी ही सभा मंजुरी देत आहे.**

**सूचक : श्री. संजय गावडे**
**अनुमोदक : श्री. गणेश तळेकर**

**ठराव एकमताने संमत.**

**विषय क्र. ५: अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे.**
कोषाध्यक्ष श्री. सतीश लोटके यांनी अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेला खर्च सभेस सादर केला. सभेने एकमताने सदर अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी दिली. यासंदर्भात खालील ठराव करण्यात आला.

**ठराव क्र. ३**

**कोषाध्यक्ष श्री. सतीश लोटके यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास ही सभा एकमताने मंजुरी देत आहे.**

**सूचक : श्री. योगेश सुपेकर**
**अनुमोदक : श्री.  सदानंद दाभाडकर**

**ठराव बहुमताने संमत.**

**विषय क्र. ६: इ.सन २०२३-२४ या वर्षाचे अंदाजपत्रक सादर करणे व संमत करणे.**
कोषाध्यक्ष श्री. सतीश लोटके यांनी इ.सन २०२३-२४ या वर्षाचे अंदाजपत्रक सभेस सादर केले. सभेने इ.सन २०२३-२४ या वर्षाचे अंदाजपत्रकाला एकमताने मंजुरी दिली. यासंदर्भात खालील ठराव करण्यात आला.

**ठराव क्र. ४**

**कोषाध्यक्ष श्री. सतीश लोटके यांनी सादर केलेल्या इ.सन २०२३-२४ या वर्षाच्या अंदाजपत्रकाला ही सभा मंजूर देत आहे.**

**सुचक: श्री. संग्राम जगताप**
**अनुमोदक: श्री. राजेश बारणे**

**ठराव एकमताने संमत.**

**विषय क्र. ७: इ.सन २०२३-२४ या वर्षाकरिता हिशेब तपासनीसांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.**
प्रमुख कार्यवाह श्री. अजित भुरे यांनी सांगितले की, इ. सन २०२३-२४ या वर्षाकरिता हिशेब तपासनीस म्हणून श्री. रवी सावंत यांची कार्यकारी समिती व नियामक मंडळ सभेने नियुक्ती केलेली आहे. सभेने त्यावर एकमताने मंजुरी दिली. मागील प्रमाणे मेहनताना देण्यात यावा असे ठरले. यासंदर्भात खालील ठराव करण्यात आला.

**ठराव क्र. ५**
**इ.सन २०२३-२४ या वर्षाकरिता हिशेब तपासनीस म्हणून मा. श्री. रवी सावंत यांची नेमणूक ही सभा एकमताने करीत आहे. व मागील प्रमाणे मेहनताना देण्यात यावा असे ही ठरले.**

**सुचक: श्री. विश्वनाथ कामथ**
**अनुमोदक: श्री. सुरेश सावंत**

**ठराव एकमताने संमत.**

**विषय क्र. ८: नाटय संकुल प्रगतीचा आढावा घेणे व भावी कामकाजाविषयी निर्णय.**
प्रमुख कार्यवाह श्री. अजित भुरे यांनी सांगितले की, नाट्य संकुलाबाबत अध्यक्ष श्री. प्रशांत दामले सविस्तर माहिती दिली. त्याप्रमाणे अध्यक्ष श्री. प्रशांत दामले यांनी सांगितले की, नाट्य संकुल दुरुस्तीसाठी मुख्यमंत्री मा.श्री. एकनाथ शिंदे यांनी रु. १० कोटी निधी मंजूर केलेला आहे. सदर निधी म्हाडातर्फे वितरीत करण्यात येणार असून नाट्य संकुलाची दुरुस्ती लवकरात लवकर कसे सुरु होईल, यासाठी प्रयत्न सुरु आहेत. त्यासाठी नाट्य संकुल २-३ महिने बंद ठेवावे लागणार आहे. तसेच बी हॉलच्या बाजूची रिकामी असलेली जागा भाड्याने देणार आहोत. नाट्य संकुलाचा प्रलंबित मालमत्ता कर रु. १ कोटी ५० लाखापर्यंत आहे. मातोश्री इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीकडून रु. १ कोटी भाडे येणे आहे. सदर भाडे आल्यानंतर आपण संपूर्ण कर भरू शकतो. अन्यथा म्युनिसिपालचा कर हप्त्याद्वारे कसे भरता येईल यासाठी प्रयत्न करावा लागेल. सभेने याची नोंद घेतली.

ते पुढे म्हणले की, १०० व्या नाट्य संकुलाच्या उत्पनातून एफ.डी. कशी करता येईल. किंवा नाट्य संकुलातील उर्वीरत असलेली जागा कशी वापरता येईल, त्यासाठी लागणारी परवानगी कशी घेता येईल, यासाठी प्रयत्न सुरु आहे. सदस्य श्री. दिवाकर दळवी म्हणाले की, मुंबईतील मोठमोठे बिझनेसमॅन आहेत. त्यांचाकडून जास्तीत जास्त निधी कसा उपलब्ध करता येईल. यासाठी प्रयत्न करावा. सभेने याची नोंद घेतली.

सभेने वरील सर्व बाबी एकमताने मंजुरी दिली. यासंदर्भात खालील ठराव करण्यात आला.

**ठराव क्र. ६**
**नाट्यसंकुल दुरुस्तीसाठी महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेला निधी म्हाडातर्फे वितरीत होणार असून ही सभा मंजुरी देत आहे.**

**सुचक: श्री. निलेश प्रभाकर**
**अनुमोदक: श्री. विश्वास देशपांडे**

**ठराव एकमताने संमत.**

**विषय क्र. ९: १०० वे नाटय संमेलनाबाबतची माहिती.**
अध्यक्ष श्री. प्रशांत दामले यांनी सांगितले की, १०० व्या नाट्य संमेलनानिमित्त नाट्यकलेचा जागर महोत्सव आयोजित केलेला आहे. या नाट्यकलेचा जागर स्पर्धेत एकपात्री, एकांकिका, बालनाट्य, नाट्य वाचन, नाट्य संगीत पद गायन, नाट्य छटा या स्पर्धांचा समावेश असणार आहे. ही स्पर्धा २२ केंद्रावर संपन्न होणार आहे. या स्पर्धेचे स्पर्धा प्रमुख म्हणून डॉ. अनिल बांदिवडेकर असणार आहेत. या स्पर्धेच्या नवीन संहितेसाठी रु. १ लाखाचे बक्षिस ठेवले आहे. सभेने याची नोंद घेतली.

१०० वे नाट्य संमेलन दि. ५,६,७ जानेवारी २०२४ मध्ये पिंपरी–चिंचवड येथे संपन्न होईल. त्यानंतर विभागीय नाट्य संमेलन होतील. त्यानंतर नाट्यकलेचा जागर स्पर्धेतील अंतिम फेरी एप्रिल २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात संपन्न होईल. विभागीय

संमेलन व इतर उपक्रम त्यानंतर नाट्य संमेलनाची सांगता मे २०२४ रोजी रत्नागिरी येथे संपन्न होईल. या व्यतिरिक्त इतर सविस्तर माहिती सभेस देण्यात आली. सभेने त्याची नोंद घेतली.

सदस्य श्री. सागर सातपुते यांनी सांगितले की, नाट्य परिषदेचे सोशल मिडिया ॲक्टीव होणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रमोशन जलदगतीने होईल. यासाठी सोशल मिडियावर लक्ष देणे फार गरजेचे आहे. यावर अध्यक्ष श्री. प्रशांत दामले म्हणाले की, नाट्य परिषदेच्या वेबसाईटचे काम सुरु आहे. ते पुढील १ महिन्यात ॲक्टीव होईल. तसेच नाट्य परिषदेचे फेसबुक, इन्स्टा यावरसुद्धा काम सुरु असून या सोशल मीडियाची जबाबदारी श्रीमती वैजयंती आपटे यांना देण्यात आलेली आहे. परंतु सोशल मिडियाचे काम दिमाख कंपनीला देण्यात आलेले आहे. तसेच वेबसाईटवर ६० शाखांची ६० वेगळे पेज असणार आहे. त्यात प्रत्येक शाखेची संपूर्ण माहिती, वार्षिक उपक्रम इत्यादी माहिती दिली जाईल. यासाठी बराच कालावधी लागणार आहे. सभेने याची नोंद घेतली.

तसेच १०० व्या नाट्य संमेलनासाठी मंजूर झालेला निधी रु. १० कोटी तसेच विविध ठिकाणाहून निधी जमा करण्याचा प्रयत्न सुरु आहे. सदर खर्च करण्यासाठी सभेने मंजुरी द्यावी.

**ठराव क्र. ७**
**१०० व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनासाठी मंजूर झालेला निधी रु. १० कोटी व त्यापेक्षा अधिक रु. ५ कोटी असे एकूण रु. १५ कोटी खर्च करण्यासाठी ही सभा मंजुरी देत आहे.**

**सूचक : श्री. रत्नकांत जगताप**
**अनुमोदक : श्री. प्रमोद रणनवरे**

**ठराव एकमताने समंत.**

अध्यक्ष श्री. प्रशांत दामले यांनी सांगितले की, नाट्य परिषद ही सेवाभावी संस्था असल्यामुळे या संस्थेकडे पुढील काळात रु. २० ते रु. ३० कोटी असणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. सभेने अध्यक्षांचे अभिनंदन केले.

**विषय क्र. १० : सभासदांकडून रीतसर आलेल्या ठरावांवर व सूचनांवर चर्चा घडवून बहुमताने निर्णय घेणे.**

१. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या सोलापूर उपनगरीय शाखेने सध्याच्या घटनेतील त्रुटी दुरुस्त करण्याबाबत विनंती केलेल्या पत्राचे वाचन प्रमुख कार्यवाह श्री. अजित भुरे यांनी केले. यावर सभेने घटनेतील त्रुटी दुरुस्ती करण्यासाठी कार्यकारी समितीला परवानगी दिली आहे.

२. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या सोलापूर उपनगरीय शाखेने गो. ब. देवल पुरस्कार समारंभ पुन्हा पूर्वीच्या ५२ पुराकारासह सुरु करण्याबाबत निर्णय घेण्यात येण्याबाबत पत्र दिले आहे. यावर कोषाध्यक्ष श्री. सतीश लोटके यांनी सांगितले की, पुढील वर्षापासून सर्व पुरस्कारांची तपासणी करून पुरस्कार वाढविण्यात येतील. सभेने याची नोंद घेतली.

**विषय क्र. ११ : अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी आलेल्या विषयांची चर्चा करणे व ठराव संमत करून बहुमताने निर्णय घेणे.**

प्रमुख कार्यवाह श्री. अजित भुरे म्हणाले की, नाट्य परिषदेच्या घटक संस्थापैकी मराठी नाट्य व्यावसायिक निर्माता संघ, मराठी व्यावसायिक नाट्य कलाकार संघ, मराठी नाटककार संघ, हौशी रंगमंच संघटना, बालरंगभूमी परिषद या संस्थांच्या घटनेत समावेश आहे. त्यापैकी नवीन रंगधर्मी जागतिक नाट्य निर्माता संघाला घटनेत समाविष्ट करावे लागेल. तसेच चर्चेत सहभागी होत, कोषाध्यक्ष श्री. सतीश लोटके म्हणाले की, महाराष्ट्र व्यवस्थापक संघाचे पत्र आलेले असून सदर संस्थेचा आपल्या घटक संस्थेत समाविष्ट करून घावे लागेल.

प्रमुख कार्यवाह श्री. अजित भुरे म्हणाले की, नाट्य परिषदेच्या घटनेतील नियमानुसार सदर घटक संस्थाना समाविष्ट करण्यासाठी तज्ञांना विचारावे लागेल. यावर अध्यक्ष श्री. प्रशांत दामले म्हणाले की, विशेष बाब म्हणून या संस्थाना घटक संस्थांना निमंत्रित म्हणून समाविष्ट करावे. यावर सभेत साधक-बाधक चर्चा करण्यात आली. चर्चेत सहभागी होत सदस्य श्री. संदीप जंगम म्हणाले की, आपल्या घटनेतील असलेल्या घटक संस्थापैकी किती घटक संस्था कार्यान्वित आहेत किंवा जे अकार्यक्षम असलेल्या घटक संस्था कार्यक्षम कशा करता येतील, यासाठी प्रयत्न करावा. त्यापैकी प्रायोगिक रंगमंच संघटना कार्यान्वित व्हावी, यासाठी गेल्या ५ वर्षापासून मध्यवर्तीला पत्रव्यवहार करीत असल्याचे सांगितले. यावर प्रमुख कार्यवाह श्री. अजित भुरे यांनी प्रायोगिक रंगमंच संघटना लवकरच  कार्यान्वित करण्यात येईल. सभेने याची नोंद घेतली.

सदस्य श्री. प्रदीप कबरे यांनी सांगितले की, नव्याने समाविष्ट करावयाच्या संस्था ह्या नाट्य परिषदेच्या घटनेत दुरुस्ती झाल्यानंतर समाविष्ट कराव्यात. यावर अध्यक्ष श्री. प्रशांत दामले म्हणाले की, दोन्ही संस्थांचे लिगल पेपर व्यवस्थित असल्यामुळे त्यांना निमंत्रित संस्था म्हणून समाविष्ट करावे. यावर श्री. प्रदीप कबरे यांनी आक्षेप नोंदवला. सभेत यावर साधक-बाधक चर्चा करण्यात आली. चर्चेअंती घटना दुरुस्ती झाल्यानंतर सदर संस्थाना समाविष्ट करण्यात यावे असे ठरले.

खेळीमेळीच्या वातावरणात सभा संपन्न झाल्याबद्दल सदस्य श्री. कृष्णा जाधव यांनी अध्यक्षांचे व सभासदांचे आभार मानले.

सभेपुढील सर्व विषयांवर चर्चा संपल्यामुळे सभेचे कामकाज संपल्याचे अध्यक्षांनी जाहिर केले.

अध्यक्ष | प्रमुख कार्यवाह